दै. समता दर्शन (२) दि. ४/८/१७

# मनपाच्या प्रभाग रचनेवर ८२ जणांचे आक्षेप; १० ऑगस्टला निर्णय

नांदेड : महापालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या जाहीर झालेल्या प्रभागरचना व आरक्षणावर हरकती आणि सुचना दाखल करण्यासाठी १९ जुलै ही शेवटची तारीख होती. या दिवसापर्यंत ८२ जणांचे आक्षेप दाखल झाले असून यावर निवडणुक विभाग १० ऑगस्ट २०१७ पर्यंत या आक्षेपावर सुनावणी घेऊन निर्णय जाहीर करणार आहेत.

नांदेड महानगरपालिका निवडणुकीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी यावर्षी नव्यानेच प्रभागरचना तयार झाली असून प्रभागरचना आणि आरक्षणावर ज्यांना कोणाला आक्षेप घ्यायचा आहे व हरकती किंवा सुचना नोंदवायच्या असतील त्यांनी दि. ११ ते १९ जुलैच्या दरम्यान मनपा आयुक्त यांच्या कक्षासह क्षेत्रीय कार्यालयामध्ये आक्षेप दाखल करण्यात यावे असे सांगितले होते. या अनुषंगाने शहरातील २० प्रभागातून तब्बल ८२ जणांची आक्षेप दाखल केले आहेत. सुरूवातीला आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली होती. एका प्रभागात ओबीसी महिला देण्यात चुक झाल्यामुळे ती दुरूस्ती करण्यासाठी पुन्हा १० जुलै रोजी आरक्षणाची फेरसोडत काढण्यात आली. यामुळे ५ प्रभागातील आरक्षणाचे चित्र बदलेले होते. प्रत्येक प्रभागात किमांन १ जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी सुटल्यामुळे याचा सर्वांना सारखाच लाभ झाल्याची ...समोर आली होती. यामुळे

## मनपाच्या प्रभाग रचनेवर...

विशेषत: आक्षेप नोंदवता अनेकांनी हद्द ही रस्ता, नाली, किंवा ठराविक ठिकाणाहून हद्द तयार करण्यात यावी असा आक्षेप अनेकांनी नोंदविला असल्याचे समोर आले आहे.

### मनपाने केली २० लोटेबहाद्दरांवर कार्यवाही

महानगरपालिकेच्यावतीने स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत लोटेबहाद्दरांविरूद्ध कारवाईची मोहिम राबविली असून यात दुसऱ्या दिवशीही २० लोटेबहाद्दरांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. शहरातील चारही झोन अंतर्गत पथके तयार करून उघड्यावर शौचालयास बसणाऱ्या नागरिकांवर कारवाई मोहिम हाती घेतली आहे. यात २० नागरिकांवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत, अशी माहिती मनपा आयुक्त गणेश देशमुख यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.